# केंद्रीय साहित्य अकादमीचा काव्योत्सव

## पूर्वोत्तर व पश्चिम भारतीय साहित्यिकांचा सहभाग | एकूण बत्तीस कवींचा सहभाग

**प्रतिनिधी**
धारबांदोडा

केंद्रीय साहित्य अकादमीतर्फे पूर्वोत्तर आणि पश्चिम भारतातील साहित्यिकांसाठी काव्योत्सव हा कार्यक्रम नुकताच सुर्ला साकोर्डा येथील नेचर्सनेस्ट याठिकाणी आयोजित करण्यात आला. विविध आठ भाषांतील एकूण ३२ कवींचा या कार्यक्रमात सहभाग होता. दोन दिवस चाललेल्या या कार्यशाळेत काव्य व इतर साहित्यावर चर्चा तसेच प्रबंध सादर करण्यात आले.



साकोर्डा : काव्योत्सवात सहभागी झालेले विविध भारतीय भाषांतील कवी व साहित्यिक.

कार्यशाळेचे उद्घाटन कोकणी कवी प्रकाश पाडगावकर यांच्याहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकणी सल्लागार मंडळाचे निमंत्रक भूषण भावे तर खास अतिथी म्हणून बोडो भाषा सल्लागार मंडळाचे निमंत्रक अनिल बोडो हे उपस्थित होते. उद्घाटन सत्रात गुजराती सल्लागार मंडळाचे निमंत्रक विनोदी जोशी यांनी विचार मांडले. कविता हा साहित्यप्रकार विविध मानवी संस्कृतीमधील सेतू आहे आणि सर्व भारतीय भाषांमधील कवींनी परस्पराच्या साहित्याबद्दल ओळख व देवाण घेवाण करण्याची गरज साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी आपल्या स्वागतपर भाषणात व्यक्त केली.

उद्घाटन सोहळ्यानंतर पहिल्या सत्रात असमिया म्हणजेच बोडो कवितांची परंपरा या विषयावर विपुल दऊरी यांनी आसामी भाषेत तर आदाराम बसूमतारी यांनी बोडो भाषेत विचार मांडले. साहित्य अकादमीचे मराठी परामर्श मंडळ संयोजक रंगनाथ पठारे हे अध्यक्षस्थानी होते. या सत्रात आसामी भाषेतील सौरव सैकिया, बोडो भाषेतील रश्मी चौधरी, गुरजराती भाषेतील चौला दोषी तर कोकणी भाषेतील रोझारिया पिंटो या कवींनी सहभाग घेतला. दुसऱ्या सत्रात मराठी आणि मणिपूरी कवितांची परंपरा या विषयावर आर. के. भूवोनसिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सादरीकरणात मराठीतील केशव देशमुख व मणिपूरी साहित्यिक प्रेमचंद सिंह यांनी प्रबंध सादर केले. त्यात बोडो भाषेतील रितूराज बसूमतारी, गुजराती भाषेतील मुकेश जोशी, कोकणीतील रमेश घाडी, मणिपुरी भाषेतील एस. प्रल्हाद व नेपाळीतील दिगंबिर मुखिया या कवींचा सहभाग होता. आर. एस. भास्कर यांच्या अध्यक्षतेखाली गुजराती आणि कोकणी कवितेची परंपरा या विषयावर तिसरेसत्र झाले. त्यात अजयसिंह चौहान या गुजराती तर राजय पवार या कोकणी साहित्यिकांनी प्रबंध सादर केले. त्यात मराठीतील अशोक कोतवाल, मणिपुरीतील आर. के. भुवोनसिंह, नेपाळीतील गणेश गजमेर, तर सिंधी भाषेतील नारी लछवाणी या कवींचा सहभाग होता.

नेपाळी आणि सिंधी कवितांची परपंरा या विषयावर लक्ष्मण दुबे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या चौथ्या सत्रात बी. आर. उप्रेती या नेपाळी तर खिमन मुलाणी या सिंधी साहित्यिकांनी प्रबंध सादर केले. त्यात आसामी कवी अजित गोगोई, कोकणी कवी दिलीप धारगळकर, मराठी कवी लक्ष्मण महाडीक व सिंधी कवी हरिष करमचंदानी यांचा सहभाग होता.